# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## जुलै २०२४

# ई वार्ता




LEGEND

| | | |
|---|---|---|
| | Central Campus of MPKV | |
| | Agril. Research Station | 27 |
| | Post Graduate Institute | 01 |
| | Agril. Technology Information Centre | 01 |
| | Regional Extension Centre | 04 |
| | District Extension Centre | 05 |
| | Krishi Vigyan Kendra | 04 |
| | Agricultural Tech. School | 08 |
| | Agricultural Engg. College | 02 |
| | Agricultural College | 08 |
| | Horticulture College | 02 |
| C | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७५०/२०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

**अभिनंदन**

## कृषि विद्यापीठाचा कास्ट प्रकल्प वसंतराव नाईक पुरस्काराने सन्मानीत



**दि. १ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कास्ट प्रकल्पास (दि. १ जुलै) कृषि दिनाच्या दिवशी मुंबई येथे नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झालेल्या कार्यक्रमात वसंतराव नाईक कृषि पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. वसंतराव नाईक कृषि संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वतीने माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या १११ व्या जन्मदिनानिमित्त सदरील पुरस्काराचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. सदरचा पुरस्कार कृषि मंत्री मा.ना.श्री. धनंजय मुंडे यांच्या हस्ते देण्यात आला. हा पुरस्कार कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, सहप्रमुख अन्वेषक डॉ. मुकुंद शिंदे व कास्ट प्रकल्पाचे सदस्य यांनी स्विकारला. पुरस्काराचे स्वरुप रु. ५१ हजार रोख व स्मृतीचिन्ह असे आहे. या पुरस्कार वितरणप्रसंगी राज्याचे कृषि मुल्य आयोगाचे अध्यक्ष श्री. पाशा पटेल, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. राजेंद्र बारवाले, कार्याध्यक्ष श्री. अविनाश नाईक, कोषाध्यक्ष डॉ. बकुळ पटेल यावेळी उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे सन २०१८–२०२३ या कालावधीत कास्ट प्रकल्प राबविण्यात आला. या प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक डॉ. सुनील गोरंटीवार, सह प्रमुख अन्वेषक डॉ. मुकुंद शिंदे व त्यांच्या टीमने नाविन्यपूर्ण संकल्पना मांडून राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेतून हा प्रकल्प महाराष्ट्रामध्ये खेचून आणला. मागील पाच वर्षामध्ये या प्रकल्पातर्फे विद्यार्थी, प्राध्यापक व शेतकरी या सर्वांसाठी अत्यंत मोलाचे संशोधन व भविष्यातील शेतीच्या दृष्टीने महत्वाचे असे बळकटीकरणाचे कार्य झाले आहे. या प्रकल्पांतर्गत आत्तापर्यंत आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय असे ११ प्रकल्प पूर्ण केले आहेत. या प्रकल्पाद्वारे आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय नियतकालीकांमध्ये २७ शोध निबंध प्रकाशीत झालेले आहेत तसेच आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीयस्तरावर २० पुस्तके प्रकाशीत झालेली आहेत. या प्रकल्पामध्ये क्षमता निर्माण कार्यक्रमांतर्गत २५६ प्रशिक्षणे ही ऑफलाईन व २१२ प्रशिक्षणे ऑनलाईन घेण्यात आली. यामध्ये ८२५२० प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला. या प्रकल्पांतर्गत ३१ प्राध्यापक, १२ अधिकारी व ९७ विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणासाठी परदेशात पाठविण्यात आले. कास्ट प्रकल्पांतर्गत विकसीत केलेल्या विविध नाविन्यपूर्व डिजीटल तंत्रज्ञानामध्ये ४० मोबाईल ॲप्लीकेशन व आठ वेब ॲप्लीकेशनचा समावेश आहे. कास्ट प्रकल्पातर्फे झालेले शेतीचे बळकटीकरण निश्चितच महाराष्ट्रासाठी व देशासाठी भुषणावह असे आहे. कास्ट प्रकल्पांतर्गत ड्रोन, रोबोटीक्स, आयओटी आणि हायपरस्पेक्ट्रल प्रयोगशाळा उभारण्यात आल्या. या प्रकल्पांतर्गत १४ तंत्रज्ञान व्यावसायीकदृष्ट्या प्रसारीत झाली आहे. या प्रकल्पांतर्गत एक वर्षाचा पदव्युत्तर कोर्स हा पाच विषयामध्ये तयार केला असून पदव्युत्तर व आचार्य पदवीसाठी सात कोर्सेस व १५ प्रमाणपत्र कोर्सची निर्मिती करण्यात आली आहे. सेंसर्स, ड्रोन, आयओटी आणि रोबोटीक या विषयातील ३१ टेकनॉलॉजी तयार करण्यात आल्या, त्यातील २१ टेक्नॉलॉजीच्या कॉपीराईट प्राप्त झाल्या असून १ टेक्नॉलॉजी पेटंटसाठी सादर करण्यात आली आहे. भारतीय नागरी हवामान वाहतूक संचालनालयातर्फे मान्यताप्राप्त असलेले ड्रोन पायलट प्रशिक्षण देणारे महात्मा फुले कृषि विद्यापीठ हे भारतातील पहिले कृषि विद्यापीठ ठरले असून मागील दीड वर्षात या केंद्रातर्फे अडीचशे प्रशिक्षणार्थींना ड्रोन पायलट प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. एकंदरीत कास्ट प्रकल्पातील मागील पाच वर्षाच्या कामगिरीमुळे शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर यावरती संशोधनासाठी भक्कम पायाभूत सुविधा निर्माण झाल्या असून त्याचा फायदा राज्यातील भविष्यातील शेतीसाठी निश्चित होणार आहे. कास्ट प्रकल्पाला वसंतराव नाईक पुरस्कार मिळाल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर आणि नियंत्रक श्री. सदाशिव पाटील यांनी कास्ट टिमचे अभिनंदन केले.

मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२४

## कृषि विज्ञान संकुल, काष्टी येथे आढावा बैठकीचे आयोजन





**दि. १६ जुलै, २०२४.** कृषि विज्ञान संकुल काष्टी, मालेगाव येथे महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तसेच नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. दादाजी भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ.सचिन नांदगुडे, डॉ. एस.पी. सोनवणे व इतर अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना मा.ना.श्री. दादाजी भुसे म्हणाले की कोरोनाच्या अतिशय कठीण कालावधीमध्ये अथक परीश्रमातून कृषि विज्ञान संकुलाची सन २०२०–२१ साली सुरुवात करण्यात आली. संकुलाअंतर्गत कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, कृषि तंत्रनिकेतन, कृषि महाविद्यालय, उद्यानविद्या महाविद्यालय व कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय हे एकाच वेळी मान्यता मिळालेले देश पातळी वरील एकमेव संकुल आहे. मालेगाव व पंचक्रोशीच्या विकासासाठी हा अभिनव प्रकल्प आहे. याप्रसंगी कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील आपल्या भाषणात म्हणाले की कृषि विज्ञान संकुल हा प्रकल्प म्हणजे मालेगावची कृषि पंढरी म्हणून उदयास येत आहे. अतिशय दुरदृष्टी साकारण्यात येणारा हा प्रकल्प नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना. श्री.दादाजी भुसे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्णत्वास येत आहे ही विद्यापीठासाठी अभिमानाची बाब आहे. यावेळी डॉ.सचिन नांदगुडे यांनी कृषि विज्ञान संकुलामध्ये सुरु असलेल्या सर्व कामांचे सादरीकरण करत सद्यस्थितीच्या प्रगतीवर दृष्टीक्षेप टाकला.

## कोल्हापूर कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बनविले केळीवरील सोंडेकीड नियंत्रणाच्या स्मार्ट सापळ्याचे पेटंट



**दि. १२ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या राजर्षी शाहू महाराज कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या केळी पिकांवरील सोंडेकीड नियंत्रणाच्या स्मार्ट सापळ्याच्या डिझाईनला भारत सरकारकडून पेटंट मिळाले. महाविद्यालयाचा विद्यार्थी शिवम मद्रेवार याने सहकारी मित्रांच्या सोबत महाविद्यालयाच्या उद्यानविद्या विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. रवींद्र पवार यांच्या

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मार्गदर्शनाखाली संशोधन केले. सोंडेकिडीच्या एकात्मिक नियंत्रणासाठी किडीच्या भुंग्याना आकर्षित करणाऱ्या कामगंध सापळ्यामध्ये खाद्यरूपी आमिष स्पंजाचा आणि महाविद्यालयात उत्पादित होत असलेल्या मेटाऱ्हायझीम या जैविक कीटकनाशकाचा वापर करीत हा सापळा तयार केला. कृषि महाविद्यालयाच्या चतुर्थ वर्षाचा विद्यार्थी मद्रेवार याच्या पुढाकाराने संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या या गटात संगीता धिन्वा, अपूर्वा श्रीष्टी, सिद्धाली शेगर, यश कांबळे, तुषार चव्हाण यांचा सहभाग आहे. पेटंट प्राप्त करणाऱ्या या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड यांनी अभिनंदन केले. कीटकनाशकांचे अवशेष फळामध्ये आढळून येत असल्याने रासायनिक औषधांचा मारा करणे ही निर्यातक्षम केळी उत्पादनाच्या दृष्टीने चिंतेची बाब होती. यावर उपाय शोधण्यात यश आले. या संशोधनामुळे सोंडेकीडीच्या नियंत्रणास मदत होणार आहे.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ व अम्मा असोसिएशनच्या संयुक्त संशोधनातील चार नवीन जैविक किडनाशकांच्या प्रजातींची नोंदणी



**दि. २४ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी हे देशामध्ये अग्रगन्य विद्यापीठ असून विद्यापीठ स्थापनेपासून या विद्यापीठामध्ये जैविक किडनाशकांच्या संशोधन, उत्पादन, प्रचार व प्रसार यासाठी विद्यापीठाने महत्वपुर्ण भुमिका बजावली आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि अम्मा असोसिएशन, नाशिक यांच्यामध्ये जुलै, २०१७ मध्ये जैविक किडनाशकांच्या संशोधन आणि नोंदणीसाठी सामंजस्य करार झाला होता. या सामंजस्य करारामध्ये वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभाग आणि कृषि किटकशास्त्र विभाग यांच्या संयुक्त संशोधनाव्दारे जैविक किडनाशकांची परिणामकारता, विषारीपणा व पर्यावरण पुरकता यावर संशोधनाअंती मिळालेली उपयुक्त माहिती केंद्रीय किटकनाशक मंडळ, फरीदाबाद यांच्याकडे नोंदणीसाठी सादर करण्यात आली. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली देशपातळीवर प्रथमच ट्रायकोडर्मा व्हीरीडी, बॅसिलस सबस्टीलीस, ट्रायकोडर्मा हर्जीयानम, सुडोमोनस फ्लुरोसन्स या चार नवीन जैविक किडनाशकांच्या प्रजातीसाठी व उत्पादनासाठी नोंदणीस मान्यता मिळालेली आहे. या चार नवीन जैविक किडनाशकांच्या नवीन प्रजातींना नोंदणी समितीची एकाच वेळी मान्यता मिळणे हे देशात प्रथमच घडले आहे.

या संशोधीत व नोंदणीकृत जैविक किडनाशकांच्या प्रजातींमुळे शेतकऱ्यांना पिकावरील किड व रोगांच्या व्यवस्थापनासाठी तसेच नियंत्रणासाठी वापरण्यात येणाऱ्या रासायनिक किडनाशकांचा वापर कमी होऊन पर्यावरणपुरक रोग व किडींचे व्यवस्थापन होवून अंशविरहीत शेती उत्पादन घेणे शक्य होणार आहे. जैविक किडनाशकांच्या वापरामुळे रासायनिक किडनाशकांचा वापर कमी होऊन उत्पादन खर्चात बचत होणार आहे. ही बाब शेतकऱ्यांच्या दृष्टीने फायदेशीर असून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी महत्वाचे ठरणार आहे. यासाठी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले आहे. याविषयी कुलगुरु यांनी विद्यापीठ शास्त्रज्ञांचे तसेच अम्मा असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर वाघचौरे यांचे अभिनंदन केले. यावेळी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता तथा कृषि किटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सात्ताप्पा खरबडे, वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अण्णासाहेब नवले हे उपस्थित होते. या संशोधनात तत्कालीन वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सी.डी. देवकर, सहयोगी प्राध्यापक डॉ. किरणसिंह रघुवंशी, डॉ. संजय कोळसे आणि वरिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. नारायण मुसमाडे यांचा सहभाग होता.

नवीन जैविक किडनाशकांच्या नोंदणीकामी महत्वाचा पाठपुरावा करुन नोंदणीसाठी अम्मा असोसिएशनचे सचिव डॉ. प्रशांत धारणकर आणि सर्व सदस्य यांनी मोलाची भुमिका निभावली आहे.

## कर्नाटकाच्या विधानसभेच्या सदस्य आ.सौ. माहेश्वरी वाले यांची विद्यापीठातील प्रकल्पास भेट



**दि. ९ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या आणि माजी संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार यांच्या संकल्पनेतून उभारलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्सच्या अद्ययावत व काटेकर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञान प्रकल्पास गुलबर्गा कर्नाटकाच्या विधानसभेच्या सदस्य आ.सौ. माहेश्वरी वाले यांनी भेट दिली. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक डॉ. मुकुंद शिंदे, कृषि यंत्रे व शक्ती अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. सचिन नलावडे व प्रकल्पाचे सहप्रमुख अन्वेषक डॉ. सुनिल कदम उपस्थित होते. यावेळी आ.सौ. माहेश्वरी वाले मार्गदर्शन करतांना म्हणाल्या की डिजिटल तंत्रज्ञानामध्ये शेतीला अधिक उत्पादनक्षम, संसाधनाचा आणि वेळेचा अधिक कार्यक्षमतेने वापर करण्याची क्षमता आहे. आधुनिक शेतीसाठी नवनवे डिजिटल तंत्रज्ञान विकसित होणे गरजेचे आहे. यावेळी डॉ. मुकुंद शिंदे यांनी स्वयंचलित पंप प्रणाली, सेंसर आधारित सिंचन प्रणाली आणि आयोटी पार्कबद्दल माहिती दिली. डॉ. सचिन नलावडे यांनी ड्रोन आणि रोबोटिक्स प्रयोगशाळेबद्दल आणि आधुनिक तंत्रज्ञान याविषयी माहिती दिली. हायपरस्पेक्टरल इमेजिंग प्रयोगशाळेविषयी आणि संशोधनाबद्दल माहिती डॉ. सुनिल कदम यांनी दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. विठ्ठल शिर्के यांनी स्वागत केले.

## कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रास श्री. राजू शेट्टी यांची सदिच्छा भेट



**दि. २ जुलै, २०२४.** महाराष्ट्र राज्याचे मा.खा.श्री. राजू शेट्टी यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठातील विविध विभागांना सदिच्छा भेट दिली.

सदर भेटी दरम्यान विद्यापीठाने प्रसारीत केलेले विविध वाण, कृषि तंत्रज्ञान व कृषि अवजारे यांची तपशीलवार माहिती घेतली. कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रातील व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय पाचारणे यांनी विद्यापीठाने प्रसारीत केलेले विविध पिकांचे वाण जसे रब्बी ज्वारी, गहू, हरभरा, भात, मूग, तूर, कापूस, ऊस, सोयाबीन इत्यादी पिकांविषयी लागवड तंत्रज्ञान व उत्पादन वाढीसाठी सविस्तर माहिती दिली. यावेळी विद्यापीठाची प्रकाशने व दिनदर्शिका याविषयीची माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. गोकुळ वामन यांनी दिली. माहिती केंद्रातील उद्यानविद्या विषयाचे विशेषज्ञ प्रा. अन्सारखान आत्तार यांनी विद्यापीठाने विकसित केलेले नवीन कांदा, डाळिंब, सिताफळ व विविध भाजीपाला यांची लागवड याबद्दल माहिती दिली. तसेच सदर भेटी दरम्यान विस्तार शिक्षण संचालक डॉ. जी. के. ससाणे यांचे मार्गदर्शन लाभले. श्री. राजू शेट्टी यांनी कृषि विद्यापीठातील तंत्रज्ञानाविषयी विचारलेल्या प्रश्नांना शास्त्रज्ञांनी समाधानकारक उत्तरे दिल्यानंतर त्यांनी विद्यापीठाच्या संशोधनाची प्रशंसा केली.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात ८ अधिकारी व कर्मचारी झाले सेवानिवृत्त





**दि. ३१ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सेवानिवृत्त कर्मचार्यांचा सत्कार व सेवानिवृत्त विषयक लाभ देण्यासाठी कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, प्रभारी नियंत्रक डॉ. भरत पाटील उपस्थित होते. याप्रसंगी कुलगुरु डॉ. पाटील आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की आज विद्यापीठाच्या सेवेतून निवृत्त होणाऱ्यांच्या मनात संमिश्र असे भाव असतील. खूप साऱ्या आठवणी असतील. या दिवशी इतर अधिकारी तसेच कर्मचारी यांनाही समजेल की त्यांचे वरिष्ठ सहकारी किती आत्मीयतेने आणि प्रामाणिकपणे या विद्यापीठाच्या सेवेत काम करत होते. त्यांनी आजपर्यंत केलेल्या प्रामाणिक कर्तव्यामधूनच विद्यापीठ घडत असते. कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी सर्व सेवानिवृत्तीचे लाभ दिले तर ही त्यांच्या कामाची पोहोच पावती होईल व कर्मचारी आनंदाने सेवानिवृत्त होतील. आपल्या विद्यापीठाचे नांव हे विद्यापीठातील शास्त्रज्ञ व कर्मचारी यांच्या योगदानामुळे आहे. कुलगुरुंनी यावेळी सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्याविषयी गौरवोद्गार काढले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या राहुरी व पुणे या दोन विभागातील ८ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते सेवानिवृत्त होणारे डॉ. राजेंद्र वाघ, डॉ. सुखदेव रणसिंग, डॉ. विश्वास चव्हाण, श्री. लक्ष्मणदास वैष्णव व श्री. वसंत पवार या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व कुलसचिव श्री. अरुण आनंदकर यांच्या कार्यतत्पतेमुळे सेवानिवृत्त होणाऱ्या या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी सेवानिवृत्तीविषयक लाभ अदा करण्यात आले. याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के, श्री. अरुण आनंदकर, डॉ. दिलीप पवार, डॉ. साताप्पा खडबडे, डॉ. आनंद सोळंके, डॉ. मुकुंद शिंदे, डॉ. विजू अमोलिक, डॉ. महाविरसींग चौहान यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. राजेंद्र वाघ, डॉ. सुखदेव रणसिंग व डॉ. विश्वास चव्हाण यांनी यावेळी सत्काराला उत्तर देतांना आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. संजय रुपनर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपकुलसचिव (प्रशासन) श्री. विजय पाटील, श्री. सुनील आव्हाड, श्री. वसंत अडसूरे, श्री. बाळासाहेब पाटील, श्रीमती शैला पटेकर व श्रीमती शिल्पा चतारे यांनी अथक परिश्रम घेतले.

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कुलगुरु डॉ. प्रशांतकुमार पाटील यांची विद्यापीठाच्या बिजोत्पादन प्रक्षेत्रास भेट



**दि. १८ जुलै, २०२४.** कुलगुरु डॉ. प्रशांतकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या मध्यवर्ती प्रक्षेत्रावर, वेगवेगळया संशोधन योजना, कृषि महाविद्यालये, कृषि तंत्र विद्यालये, कृषि विज्ञान केंद्र यांच्या प्रक्षेत्रावर खरीप २०२४ मध्ये दोन हजार एकरावर खरीप हंगामातील भात, मूग, उडीद, तूर, तीळ, कापूस, मका, सोयाबीन व भुईमुग पिकांच्या वेगवेगळ्या वाणांचा मूलभूत बिजोत्पादन कार्यक्रम केंद्र व राज्य शासनाच्या लक्षांकाप्रमाणे राबविण्यात आला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या उत्पादन लक्षांकापेक्षा तीन पट जास्त उत्पादन लक्षांकाचे धेय ठेवून विद्यापीठाने कार्यक्षेत्राच्या अंतर्गत असणाऱ्या बिजोत्पादन प्रक्षेत्रावर दहा हजार क्विटल बियाणे उत्पादन लक्षांकासाठी कार्यक्रम राबविला आहे. खरीप २०२४ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाने ४७५० क्विटल मुलभूत बियाणे वेगवेगळ्या शासकिय व निमशासकिय बिजोत्पादन संस्थांना विक्रीसाठी उपलब्ध करुन दिले. विक्रीतून शिल्लक राहिलेले १००० क्विटल मुलभूत बियाणे सत्यप्रत दर्जात रुपांतरीत करुन शेतकऱ्यांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले. मुलभूत बियाणे विक्री पोटी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने खरीप २०२४ मध्ये वेगवेगळ्या बिजोत्पादन संस्थेशी १३५ सामंजस्य करार केले असून त्यापोटी विद्यापीठाला रुपये १५.९० लक्ष मिळाले व खरीप २०२४ मध्ये विद्यापीठाला बियाण्याच्या विक्रीतून रुपये ३ कोटी ४१ लाख रुपये मिळाले. संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या अधिनस्त आलेल्या बिजोत्पादन क्षेत्राची ९० टक्के पेरणी झाली आहे. वेळोवेळी पडणाऱ्या पावसामुळे बिजोत्पादन क्षेत्राची स्थिती चांगली आहे. कुलगुरु डॉ. पाटील यांनी विद्यापीठाच्या मध्यवर्ती बिजोत्पादन प्रक्षेत्रास भेट दिली. यावेळी प्रमुख शास्त्रज्ञ, बियाणे डॉ. आनंद सोळंके, कुलगुरुंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल, प्रा. बाळासाहेब शेटे, डॉ. सोमनाथ धोंडे, डॉ. अनिल सुर्यवंशी, डॉ. हेमंत शिंदे, डॉ. कैलास गागरे उपस्थित होते. कुलगुरु डॉ. प्रशांतकुमार पाटील यांनी बिजोत्पादन प्रक्षेत्रास भेट दिल्यानंतर समाधान व्यक्त केले. यावेळी ब विभागाचे प्रभारी अधिकारी श्री. बुवासाहेब म्हस्के यांनी ब विभागात बिजोत्पादन घेतलेल्या पिकांची सविस्तर माहिती दिली.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन

**दि. ३० जुलै २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांचे अध्यक्षतेखाली कृषि महाविद्यालय, पुणे येथे आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, प्रमुख अतिथी श्री. बबलू मोकाले, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चव्हाण, महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. विजय तरडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रमोद पाटील आणि क्रिडा निर्देशक श्री. अभिजित नलवडे उपस्थित होते. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील एकूण २९ संघ या स्पर्धेत सहभागी झाले. त्यामध्ये मुलांचे १८ संघ आणि मुलींचे ११ संघांमधून एकूण ३४८ विद्यार्थी व विद्यार्थिनी या स्पर्धेत सहभागी झाले. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आपल्या आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की शिक्षण, अभ्यास या सोबत खेळाचेही महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोणतीही क्रीडा स्पर्धा ही खिलाडूवृत्तीने घेणे आवश्यक आहे. डॉ. महानंद माने यांनी स्पर्धेचा उद्देश विद्यार्थी जीवनात क्रीडा संस्कृतीला चालना देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये एकता आणि सहकार्याची भावना वाढविणे हा आहे. श्री. बबलू मोकाले यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, मुकूल माधव फाउंडेशनने फिनोलेक्सच्या सहकार्याने नेहमीच शेतकऱ्यांना सहाय्य केले आहे.





अशा प्रकारच्या स्पर्धेतून देशाला चांगले खेळाडू मिळतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्राध्यापक, क्रीडा शिक्षक, खेळाडू आणि विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. करुणा ताटे यांनी केले तर आभार डॉ. पल्लवी सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

## अधिष्ठाता (कृषि) डॉ. दिलीप पवार यांची मुक्ताईनगर कृषि महाविद्यालयास भेट







**दि. २४ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत मुक्ताईनगर येथील शासकीय कृषि महाविद्यालयास महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता (कृषि) डॉ. दिलीप पवार यांनी सदिच्छा भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथील राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांचा आढावा घेतला. महाविद्यालयात कार्यरत सर्व शिक्षक व शिक्षकेतर तसेच येथे शिक्षण घेत असलेले विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी कृषि पदवीधारकांना अनुभवात्मक व्यवसायभिमुख शिक्षण देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. त्याचबरोबर त्यांनी सर्व प्रयोगशाळांना भेट दिली. भेटी दरम्यान प्रयोगशाळा अधिक सुसज्य व सक्षम कशा करता येतील व त्यांचा जास्तीत जास्त उपयोग विद्यार्थ्यांना कसा करून देता येईल याबाबत प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. महाविद्यालय परिसर भेटी दरम्यान परिसरातील स्वच्छता, परिसरात नवीनच लागवड करण्यात आलेली फळझाडे, फुलझाडे, औषधी वनस्पतींची लागवड पाहून त्यांनी सर्व प्राध्यापकांचे कौतुक केले. भेटी वेळी मुक्ताईनगर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले तसेच महाविद्यालयातील विविध कार्यक्रम आणि उपक्रमांची माहिती दिली. यावेळी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार यांच्या समवेत धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे, कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके, कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, अधिष्ठाता यांचे तांत्रिक अधिकारी डॉ. रवी आंधळे व सहाय्यक कुलसचिव श्री. हेमंत सोनार उपस्थित होते. मान्यवरांचे हस्ते महाविद्यालय परिसरात आंब्याची रोपे लावण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अविनाश कोलगे यांनी तर डॉ. बाळासाहेब रोमाडे यांनी आभार व्यक्त केले.

मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संशोधन केंद्रांना संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी दिल्या भेटी





**दि. १९ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के व सहयोगी संशोधन संचालक डॉ. राजेंद्र वाघ यांनी जळगांव येथील तेलबीया संशोधन केंद्राला भेट देवून केंद्राच्या निमखेडी प्रक्षेत्रावरील विविध संशोधन प्रकल्पांची व त्या अंतर्गत घेण्यात आलेल्या प्रयोग व बिजोत्पादनाची माहिती घेतली व मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी प्रक्षेत्रावरील पानवेली संशोधन बागेत पानवेल पिकावरील संशोधन प्रयोगांनाही भेट दिली. यानंतर त्यांनी केळी संशोधन केंद्र व कृषि विद्यालयास भेट देवून विविध संशोधन, विस्तार व कृषि शिक्षण कार्याची माहिती घेवून शास्त्रज्ञांना मार्गदर्शन केले. या भेटीदरम्यान प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दिपक दहात, प्रकल्प समन्वयक डॉ. हेमंत बाहेती, कडधान्य पैदासकार डॉ. सुमेरसिंग राजपुत, कापूस पैदासकार डॉ. गिरीष चौधरी व वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. तुषार पाटील उपस्थित होते.

लोणावळा, जि. पुणे येथील कृषि संशोधन केंद्रास संशोधन संचालक व सहयोगी संशोधन संचालक यांनी भेट देवून संशोधन कामाची पाहणी केली. यावेळी भात रोगशास्त्रज्ञ व केंद्र प्रमुख डॉ. किरण रघुवंशी यांनी केंद्रावर सुरु असलेल्या कामाचे सादरीकरण केले. यावेळी डॉ. शिर्के यांनी भात रोगावरील विविध प्रयोगांवर संविस्तार चर्चा केली व मार्गदर्शन केले. याप्रसंगी संशोधन केंद्रावरील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कृषि संशोधन केंद्र, वडगांव मावळ, जि. पुणे येथे डॉ. विठ्ठल शिर्के व डॉ. राजेंद्र वाघ यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी संशोधन केंद्रात होत असलेल्या विविध संशोधन उपक्रमांचा आढावा घेतला. प्रक्षेत्रावरील विद्यापीठीय व अखिल भारतीय समन्वीत विविध प्रयोगांची पाहणी केली. याशिवाय स्वयंचलीत चार ओळ भात लागवड यंत्राने लागवड करण्यासाठी तयार केलेल्या रोपवाटीकेसही भेट दिली. यावेळी कृषि संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. नरेंद्र काशिद, सहाय्यक प्राध्यापक (वनस्पतीशास्त्र) डॉ. तुकाराम भोर उपस्थित होते.

## संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या शुभहस्ते हाळगावच्या कृषि महाविद्यालयात वृक्षारोपण





**दि. १० जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्याल, हाळगाव येथे भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी कृषि महाविद्यालयातील प्रयोगशाळा, प्रक्षेत्र, ग्रंथालय व जिमखाना या विकास

कामांचा सहयोगी अधिष्ठाता व महाविद्यालयातील शिक्षक यांच्याकडून आढावा घेतला. यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी हितगुज साधले. सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांनी महाविद्यालयाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या भेटी दरम्यान डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या वसतिगृहाच्या आवारामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय सोनवणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे, डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. नजीर तांबोळी, प्रा. पोपट पवार, प्रा. अरुण पाळंदे व इतर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जबलपुर येथे सौर उर्जा सिंचन योजनेच्या प्रशिक्षणासाठी शास्त्रज्ञ व शेतकरी रवाना



**दि. २ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातर्फे शास्त्रज्ञ व शेतकऱ्यांसाठी सौर उर्जा सिंचन योजना या विषयावर तीन दिवसांच्या क्षमता विकास प्रशिक्षणासाठी जबलपुर–मध्यप्रदेश येथे बोरलॉग इंस्टिट्युट ऑफ साउथ एशिया (बीसा) या संस्थेत २० शास्त्रज्ञ व १२ शेतकरी असे एकुण ३२ प्रशिक्षणार्थींची दुसरी तुकडी रवाना झाली. या तीन दिवसाच्या प्रशिक्षणात बोरलॉग इन्स्टिट्युटचे प्रमुख डॉ. रवी गोपालसिंग व त्यांचे सहकारी डॉ. प्रभात कनुजे आणि डॉ. विवेक सिंग हे प्रशिक्षण देणार आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे सुचनेनुसार व माजी संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील शास्त्रज्ञ व शेतकरी यांच्यासाठी सदरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या या दुसऱ्या तुकडीच्या बसला कृषि अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख व आंतरविद्याशाखा जलव्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. मुकुंद शिंदे यांनी निरोप दिला. यावेळी डॉ. मुकुंद शिंदे म्हणाले की या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींना विविध प्रकारच्या सिंचन पध्दतींमध्ये केलेला सोलरचा उपयोग या संबंधीचा अभ्यास करता येणार आहे तसेच सौर उर्जेचा सिंचन पध्दतींमध्ये होणाऱ्या वापराविषयी जागृती होणार आहे. या कार्यक्रमाप्रसंगी जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सुनील कदम व संशोधन सहयोगी डॉ. शुभांगी घाडगे उपस्थित होते.

## जबलपुर येथे सौर उर्जा सिंचन योजनेच्या प्रशिक्षणासाठी शास्त्रज्ञ, कर्मचारी महिला व शेतकरी महिला रवाना



**दि. ८ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातर्फे शास्त्रज्ञ व शेतकऱ्यांसाठी सौर उर्जा सिंचन योजना या विषयावर तीन दिवसांच्या क्षमता

विकास प्रशिक्षणासाठी जबलपुर–मध्यप्रदेश येथे बोरलॉग इंन्स्टिट्युट ऑफ साउथ एशिया (बीसा) या संस्थेत २५ शास्त्रज्ञ, कर्मचारी महिला व १२ शेतकरी महिला असे एकुण ३७ प्रशिक्षणार्थींची तिसरी तुकडी रवाना झाली. या तीन दिवसाच्या प्रशिक्षणात बोरलॉग इन्स्टिट्युटचे प्रकल्प समन्वयक श्री. महेश मस्के, प्रशिक्षण तज्ञ श्री. ललीत शर्मा, डॉ. प्रभात कनुजे आणि डॉ. विवेक सिंग हे प्रशिक्षण देणार आहेत. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे सुचनेनुसार व माजी संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील शास्त्रज्ञ व शेतकरी यांच्यासाठी सदरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या या तिसऱ्या तुकडीच्या बसला कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी निरोप दिला. यावेळी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, माजी संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, कृषि अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख व आंतरविद्याशाखा जलव्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. मुकुंद शिंदे, कुलगुरुंचे तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल व संशोधन उपसंचालक डॉ. पांडुरंग शेंडगे उपस्थित होते. यावेळी डॉ. शिर्के म्हणाले की या प्रशिक्षणामध्ये सहभागी होणाऱ्या कर्मचारी तसेच शेतकरी महिलांना या प्रशिक्षणाचा फायदा त्यांच्या शेतीमध्ये सोलर सिस्टीमचे युनिट बसविण्यासाठी महत्वाचा ठरु शकतो. डॉ. गोरंटीवार आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शेतकरी महिलांनी या प्रशिक्षणाचा फायदा जास्तीत जास्त कसा होईल ते पहावे. त्यांना सोलर सिस्टीमसाठी प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यासाठी या प्रशिक्षणाचा उपयोग होईल. या कार्यक्रमाप्रसंगी या प्रकल्पातील संशोधन सहयोगी डॉ. शुभांगी घाडगे उपस्थित होत्या.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात शेळीपालनावरील तीन दिवसीय प्रशिक्षण संपन्न



**दि. ९ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील अखिल भारतीय समन्वीत शेळी सुधार प्रकल्पांतर्गत शेळीपालकांसाठी शाश्वत शेळीपालन तंत्र या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली शेळी सुधार प्रकल्पामध्ये प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दिनकर कांबळे, प्रकल्पाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रशिक्षण समन्वयक डॉ. विष्णू नरवडे, डॉ. दिलीप देवकर, डॉ. उल्हास गायकवाड व डॉ. अमर लोखंडे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. दिनकर कांबळे मार्गदर्शनात म्हणाले की, शेतकऱ्यांना विद्यापीठामार्फत दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन आपला शेळीपालन व्यवसाय किफायतशीररित्या करून जास्तीत जास्त नफा मिळवावा. व्यवसाय म्हणून शेळीपालन केल्यास त्यापासून शाश्वत उत्पादन शक्य आहे. यावेळी प्रास्ताविकात प्रशिक्षण समन्वयक व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विष्णू नरवडे यांनी शेळीपालकांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती, शाश्वत व व्यावसायिक शेळीपालानाबाबत तसेच नवनवीन तंत्रज्ञानाबाबत सजगता निर्माण व्हावी हेतूने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. आजपर्यंत २३ प्रशिक्षण वर्गाद्वारे ८८४ प्रशिक्षणार्थींनी लाभ घेतला आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. उल्हास गायकवाड, डॉ. महेंद्र मोटे, डॉ. योगेश कांदळकर, डॉ. दिलीप देवकर, डॉ. संदीप लांडगे, डॉ. ज्ञानेश्वर पतंगे, डॉ. रविंद्र निमसे, डॉ. विष्णू नरवडे इत्यादी शास्त्रज्ञांनी शास्त्रोक्त पद्धतीने पैदास, आहार व आरोग्य व्यवस्थापन, पशुधनासाठी चारा व्यवस्थापन तसेच शेळीच्या दुधाचे गुणधर्म व मूल्यवर्धन, अझोला व गांडूळखत निर्मिती यासंबंधी सखोल मार्गदर्शन केले. राहुरी येथील पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ.संतोष पालवे यांनी शासनाच्या शेळीपालनासाठी असलेल्या विविध योजना व प्रकल्प आराखडा तयार करण्यासंबंधी प्रशिक्षणार्थींना प्रगल्भ मार्गदर्शन करून अवगत केले. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पुस्तिका व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

प्रा. अमर लोखंडे व आभार प्रदर्शन डॉ. उल्हास गायकवाड यांनी केले. सदरच्या प्रशिक्षणात एकूण ५६ प्रशिक्षणार्थींनी भाग घेऊन शाश्वत शेळीपालन तंत्र या विषयावरचे प्रशिक्षण पूर्ण केले. कार्यक्रम यशस्वी होणेसाठी प्रा. महेश तनपुरे, श्री. बोरकर, श्री. संदीप पवार, श्री. गौरव घोलप, श्री. रमेश कल्हापुरे, श्री. अजय गुलदगड इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.

## राहुरी कृषि विद्यापीठात काटेकोर शेती तंत्रज्ञानावर आधारित शेतकरी प्रशिक्षण संपन्न




**दि. १९ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील काटेकोर शेती विकास केंद्र व एनसीपीएएच, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने काटेकोर शेती विकास केंद्र येथे काटेकोर शेती तंत्रज्ञानावर आधारित एक दिवसीय शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये डॉ. सुनिल कदम, श्री. सचिन मोरे, डॉ. शुभांगी घाडगे, डॉ. गिरीष भनगे यांनी शेतकऱ्यांना काटेकोर पाणी व्यवस्थापनासाठी आयओटी तंत्रज्ञान, काटेकोर शेतीसाठी हरितगृह तंत्रज्ञान, संरक्षित लागवडीसाठी शासकीय योजना या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेन्टर ऑफ एक्सलेन्स या प्रक्षेत्राला शेतकऱ्यांची भेट आयोजीत करण्यात आली होती. याप्रसंगी प्रशिक्षणार्थींना विविध आयओटी तंत्रज्ञान उपकरणांची माहिती देवून प्रक्षेत्रावर ड्रोन फवारणी तंत्रज्ञान प्रात्यक्षिकासह दाखविण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. एस.बी. गडगे व काटेकोर शेती विकास केंद्राचे प्रमुख संशोधक डॉ. सचिन डिंग्रे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एस.बी. गडगे यांनी केले. या कार्यक्रमासाठी राहुरी तालुक्यातील विविध गावांतुन आलेले ३५ शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषि सहाय्यक श्री. योगेश राजळे व श्री. रंजन पांडे यांनी विशेष मेहनत घेतली.

## बाबुर्डी घुमट येथे काटेकोर पाणी व्यवस्थापन या विषयावरील प्रशिक्षण संपन्न



**दि. २९ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाद्वारे पुरस्कृत विद्यापीठ

प्रणालीद्वारे विज्ञान आणि तंत्रज्ञान अनुपयोगासाठी सहाय्य प्रकल्पअंतर्गत बाबुर्डी घुमट, जि. अहमदनगर येथे एक दिवसीय काटेकोर पाणी व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबुर्डी घुमट गावच्या सरपंच सौ. नमिता राहुल पंचमुख या होत्या. या एक दिवसीय प्रशिक्षणात प्रकल्पाचे संशोधन सहयोगी इंजि. अभिषेक दातीर यांनी पिकांच्या पाण्याची गरज काढण्यासाठी फुले इरिगेशन शेड्युलर मोबाईल ॲपचा वापर याविषयी सविस्तर माहिती दिली. संशोधन सहयोगी इंजि. तेजश्री नवले यांनी प्रकल्प अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या आयोटी तंत्रज्ञानाचा वापर काटेकोर पाणी व्यवस्थापनाकरिता कसा करावा या तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले. डॉ. शुभांगी घाडगे यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कास्ट प्रकल्पांतर्गत विकसित करण्यात आलेल्या काटेकोर शेतीसाठी मोबाईलचा वापर याविषयी माहिती दिली. या प्रशिक्षणाचे आयोजक म्हणुन कृषि अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख तथा काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाद्वारे पुरस्कृत विद्यापीठ प्रणालीद्वारे विज्ञान आणि तंत्रज्ञान अनुप्रयोगासाठी सहाय्य प्रकल्पाचे प्रमुख संशोधक तथा जलसिंचन व निचरा अभियांत्रिकीचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सुनिल कदम यांनी काम पाहिले. या प्रशिक्षणासाठी बाबुर्डी घुमट गावातील ६० शेतकरी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमाचे आयोजन





**दि. २६ जुलै २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल कमांडट डॉ. पी.जी. पाटील यांचे प्रेरणेतून कृषि महाविद्यालय, पुणे येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सकारात्मक दृष्टिकोन रुजविण्यासाठी 'प्रेरणा' या शीर्षकाखाली विशेष व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळेचे आयोजन डॉ. शिरनामे सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे माजी अधिष्ठाता प्राध्यापक डॉ. मकरंद उपकारे, कार्यक्रम समन्वयक डॉ. वाकचौरे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. नितीनकुमार रणशूर उपस्थित होते. डॉ. उपकारे यांनी आपल्या सहसादरीकरण मनोगतात सांगितले की, आनंद प्राप्ती हेच जीवनाचे मुलभूत प्रयोजन आहे. विद्यार्थी जीवनात आत्मविश्वास वाढवणे, नेतृत्वगुण विकसित करणे, आणि प्रभावी संवाद कौशल्ये आत्मसात करण्यासाठी जागृत जिज्ञासेने आणि प्रगल्भतेने स्वजीवन ग्रंथ कसा लिहावा, स्वतःचा व्यक्तिमत्त्व प्रकार कसा ओळखावा आणि वेळेचा सदुपयोग कसा करावा याबाबतचे सखोल मार्गदर्शन केले. 'प्रेरणा' सारख्या कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक उजळते आणि ते जीवनात अधिक यशस्वी होतात असे मत नमूद केले. प्रेरणा या शीर्षकाखाली आयोजित करण्यात येणार असलेल्या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव देणे, त्यांच्या जीवनात सुसंवाद आणि सामाजिक कौशल्ये विकसित करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, सकारात्मक प्रेरणादायी दृष्टिकोन रुजविणे, समस्या निराकरणाचे तंत्र आणि वेळेचे व्यवस्थापन समजून देणे आणि त्यांच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक जीवनात त्यांना अधिक सक्षम बनवणे हा असून त्यासाठी विविध सत्रांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. महानंद माने यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कु. करूणा ताटे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. राजेश्वरी तावरे यांनी केले.

## कृषि परिषदेचे संचालक डॉ. हरीहर कौसडीकर यांची धुळे कृषि संकुलाला भेट



**दि. १९ जुलै, २०२४.** पुणे येथील महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. हरीहर कौसडीकर यांनी धुळे येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि संकुलातील कृषि महाविद्यालय, कृषि विज्ञान केंद्र, बाजरा संशोधन केंद्र तसेच कृषि तंत्र विद्यालय या ठिकाणी भेटी दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी. एम. इल्हे, घटक कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल देसले, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, डॉ. विकास भालेराव, डॉ. श्रीकांत बन, कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ, अधिकारी कर्मचारी, तसेच कृषि महाविद्यालय, धुळे येथील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आदी प्रतिनिधी उपस्थित होते. यासोबतच डॉ. हरीहर कौसडीकर यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या अधिकारी, शास्त्रज्ञ, कर्मचारी यांच्याशी सवांद साधत अडीअडचणी समजून घेत मार्गदर्शन केले. तसेच कृषि विज्ञान केंद्राने, धुळे जिल्ह्याच्या कृषि क्षेत्रात तांत्रिकदृष्ट्या व्याख्याने, प्रशिक्षणे, मेळावे, प्रात्यक्षिके इत्यादींच्या माध्यमातून विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा प्रसार आणि प्रचार केल्याने कृषि विज्ञान केंद्राचे विशेष अभिनंदन केले. बैठकीचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी व आभार डॉ. पंकज पाटील यांनी केले. या बैठकीच्या यशस्वीतेसाठी कृषि विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## कृषि विज्ञान केंद्र, बोरगांव येथील संपर्क शेतकरी श्री. विलास जाधव यांचा पीक स्पर्धेत राज्यात द्वितीय क्रमांक



**दि. २१ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या बोरगांव येथील कृषि विज्ञान केंद्राचे संपर्क शेतकरी वाई तालुक्यातील जोर येथील श्री. विलास जाधव यांनी नाचणी पिकाचे विक्रमी हेक्टरी ७०.४० क्विंटल इतके उत्पादन घेऊन राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. सन २०२३-२४ खरीप हंगामामध्ये वाई तालुका कृषि अधिकारी यांच्यामार्फत सोयाबीन, भात, नाचणी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये तालुक्यातील ५३ शेतकरी सहभागी झाले. या स्पर्धेत कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव व कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली पीक कापणी प्रयोग आयोजित करून त्यानुसार सोयाबीन, भात, नाचणी पिकांच्या उत्पादनाची नोंद घेण्यात आली. श्री. विलास जाधव यांना ४० हजार रुपये बक्षीस म्हणून कृषि आयुक्त स्तरावरून घोषित करण्यात आले आहे. यामुळे वाई तालुक्याची ओळख राज्यस्तरावर झाली आहे.

## कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन



**दि. १० जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषि महाविद्यालय, पशुसंवर्शन व दुग्धशास्त्र विभाग आणि भा.कृ.अ.प–अखिल भारतीय समन्वयीत काढणी पश्चात अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान प्रकल्प, प्रादेशिक ऊस आणि गुळ संशोधन केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसुचित जाती उपयोजनांअंतर्गत गूळयुक्त दुग्धजन्य पदार्थ तयार करणे आणि अन्नाचे नुकसान कमी करण्याबाबत जागृती करणे या विषयावरील एक दिवसीय प्रशिक्षण कार्यकम आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाच्या अध्यक्षस्थानी पशुसंवर्शन व दुग्धशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. शैलेंद्र कांबळे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक ऊस आणि गुळ संशोधन केंद्राचे कृषिविद्यावेत्ता डॉ विद्यासागर गेडाम उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमात काढणी पश्चात अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान प्रकल्प, प्रादेशिक ऊस आणि गुळ संशोधन केंद्राचे वरिष्ठ संशोधन अधिकारी डॉ. बापूराव गायकवाड, पशुसंवर्शन व दुग्धशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. ज्ञानेश्वर पंतगे, काढणीपश्चात अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान प्रकल्प, प्रादेशिक ऊस आणि गूळ संशोधन केंद्राचे कनिष्ठ संशोधन अधिकारी डॉ. गोविंद येनगे, पशुसंवर्शन व दुग्धशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. संभाजी जाधव आणि प्राध्यापिका सौ. चंदाराणी मेमाणे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणात एकूण ३० प्रशिक्षणार्थी सहभाग नोदविला होता. सर्व प्रशिक्षणार्थींनी व्यवसाय दृष्टीने हे प्रशिक्षण अत्यंत मोलाचे मार्गदर्शन मिळाल्यामुळे समाधान व्यक्त केले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे दोन प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन



**दि. २४ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे कृषि विज्ञान केंद्र आणि आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने परंपरागत कृषि विकास योजना अंतर्गत दोन दिवसीय व तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदर

प्रशिक्षणे धुळे जिल्ह्यातील क्षेत्रीय कर्मचारी, कृषि विभाग व शेतकरी उत्पादक कंपनीचे सभासद यांच्या साठी आयोजित करण्यात आले. तसेच तीन दिवसाचे प्रशिक्षण धुळे, नंदुरबार, व जळगाव जिल्ह्यातील परंपरागत योजनेअंतर्गत स्थापन झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक यांच्यासाठी आयोजित करण्यात आले. ही प्रशिक्षणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी श्री. हितेंद्र सोनवणे, आत्माचे प्रकल्प उपसंचालक श्री. विनय बोरसे, प्राध्यापक डॉ. घनश्याम काब्रा, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, विषय विशेषज्ञ डॉ. धनराज चौधरी, विषय विशेषज्ञ डॉ. अतिश पाटील व विषय विशेषज्ञ श्रीमती अमृता राऊत उपस्थित होते. सदर प्रशिक्षणामध्ये परंपरागत शेतीचे मुलभूत घटक, संकल्पना, महत्व आणि व्यवस्थापन, पारंपारिक शेतीमधील आव्हाने आणि उपाययोजना, परंपरागत शेतीमधील अन्नद्रव्य व्यवस्थापन (घनामृत, बिजामृत, जीवामृत, इ. उत्पादन तंत्रज्ञान आणि वापर), परंपरागत शेतीमध्ये पंचगव्याचे महत्व, पारंपरिक शेती आणि वातावरणातील बदल, पारंपारिक शेतीमध्ये किडींची ओळख आणि व्यवस्थापन, पारंपारिक शेतीमध्ये जैविक कीटकनाशके उत्पादन तंत्रज्ञान, पारंपारिक शेतीमध्ये रोगांची ओळख आणि व्यवस्थापन, पारंपारिक प्रमुख पिकांचे उत्पादन तंत्रज्ञान, पारंपारिक शेतीमध्ये फळबाग उत्पादन तंत्रज्ञान, पारंपारिक शेतीमधील शेतमालाचे विक्री व्यवस्थापन या विषयांवर प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांमधून मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी व आभार श्रीमती अमृता राऊत यांनी केले. या बैठकीच्या यशस्वीतेसाठी कृषि विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे ड्रोन तंत्रज्ञान प्रात्यक्षिक कार्यशाळा संपन्न





**दि. २३ जुलै २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांच्या माध्यमातून ड्रोन तंत्रज्ञान प्रात्यक्षिक धुळे जिल्ह्यामध्ये सुरू करण्यात आले आहे. या प्रात्यक्षिकासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, विस्तार शिक्षण संचालक डॉ. जी.के. ससाणे, पुणे येथील अटारीचे संचालक डॉ. एस.के. राय यांचे मार्गदर्शन मिळत आहे. हे ड्रोन तंत्रज्ञान प्रात्यक्षिक धुळे जिल्ह्यातील तिसगांव या गावी घेण्यात आले. यावेळी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, कृषि विज्ञान केंद्राचे प्रशिक्षित ड्रोन पायलट विषय विशेषज्ञ डॉ. पंकज पाटील, श्री. सुनील जंगिड, श्री. जीवन राणे, श्री. रमेश शिंदे तसेच प्रगतशील शेतकरी श्री. कैलास पाटील, श्री. भूषण शिरसाठ, श्री. नारायण माने, श्री. निंबा पाटील व महिला वर्ग मोठ्या संखेने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

**दि. २३ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, धुळे येथे पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन, कृषि महाविद्यालय आणि कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियान या योजनेची जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली. सदर जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेसाठी धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्री. विशाल नरवडे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ बबनराव इल्हे होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन नाशिक विभागाचे प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. बी.आर. नरवाडे, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, नाशिक येथील विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळेचे सहाय्यक आयुक्त डॉ.




गिरीष पाटील उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यशाळेत मुरघास तंत्रज्ञानाविषयी डॉ नेवाडकर, तसेच शेळी मेंढीपालन याविषयी डॉ. धनराज चौधरी यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ मिलिंद भणगे यांनी या योजनेविषयी सखोल मार्गदर्शन केले.

## हाळगांव कृषि महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन



**दि. १० जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव, ता. जामखेड येथे जीवन विद्या मिशन मुंबईच्या वतीने घेण्यात आलेल्या तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हाळगांव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणुन श्री. अभिजीत पाटील उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय सोनवणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे, प्रा. पवार, डॉ. प्रेरणा भोसले उपस्थित होते. यावेळी श्री. अभिजीत पाटील यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाची पद्धती,शरीराचे महत्त्व, निसर्ग नियम आणि त्याचे आपल्या जीवनातील महत्त्व व राष्ट्रभक्ती याविषयी सखोल मार्गदर्शन केले. डॉ. अनिल काळे अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की महाविद्यालयीन जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी आपल्या शरीराचे महत्त्व, निसर्ग नियमांचे पालन व राष्ट्रभक्ती जोपासणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि अर्थशास्त्र विभागामार्फत सोलापूर जिल्ह्यात शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**दि. २ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि अर्थशास्त्र विभागातील पीक उत्पादन खर्च योजनेअंतर्गत मौजे चीनके, ता. सांगोला, जि.सोलापूर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या शेतकरी मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी



कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे उपस्थित होते. यावेळी मका पैदासकार डॉ.सुनील कराड, डॉ. सुहास भिंगारदेवे व उपसरपंच श्री. मोहन मिसाळ उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणाले की मक्याखालील वाढते प्रक्षेत्र,मक्याचा वाढता औद्योगिक वापर व जनावरांच्या खाद्यात वाढता वापर यामुळे सध्याच्या काळात मका हे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पीक आहे. मक्याचे अर्थशास्त्राचा विचार करता, मका या पिकास इतर पिकांपेक्षा चांगला दर मिळत असल्याचे दिसत आहे. यावेळी डॉ. सुनील कराड यांनी मका लागवड तंत्रज्ञान, जमीन व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, एकरी बियाणे दर व रोपांची संख्या याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. सुहास भिंगारदेवे यांनी केले, आभार श्री. मोहन मिसाळ यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कृषि सहाय्यक श्री. विष्णू मिसाळ, श्री. धनाजी शिरगावे, डॉ. नवनाथ मिसाळ यांनी सहकार्य केले.

## जाधववाडी येथे सिताफळ बहार व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण संपन्न



**दि. १ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, जि. पुणे आणि तालुका कृषि अधिकारी, पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांना हंगामाच्या सुरुवातीपासूनच योग्य मार्गदर्शन होण्याकरीता मौजे पिंगोरी, ता. पुरंदर येथे प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप दळवे, रोगशास्त्रज्ञ डॉ. युवराज बालगुडे, जेजुरीचे मंडळ कृषि अधिकारी श्री. अनिल धुरगुडे उपस्थित होते. यावेळी झालेल्या तांत्रिक मार्गदर्शनात डॉ. प्रदिप दळवे यांनी सिताफळ बहार व्यवस्थापन या विषयावर, डॉ. युवराज बालगुडे यांनी सिताफळ रोग–कीड व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. श्री. अनिल धुरगुडे यांनी फळबाग लागवडी संदर्भात असलेल्या शासकीय योजनांची माहिती दिली. याप्रसंगी डॉ. दळवे यांनी सिताफळ बागेत छाटणीचे प्रात्यक्षिक उपस्थितांना करून दाखविले. या कार्यक्रमाचे नियोजन कृषि पर्यवेक्षक श्री. पी.जी. अडसूळ आणि श्री.प्रमोद खेडकर आणि श्रीमती गीता पवार, कृषि सहायक यांनी केले. सदर प्रशिक्षणास आदर्श महिला गटाच्या महिला आणि मौजे पिंगोरी भागातील सिताफळ उत्पादक शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

## जाधववाडी येथील संशोधन केंद्रात डॉ. जी. एस. चिमा यांची जयंती साजरी



**दि. २ जुलै, २०२४** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी येथे भारतीय फलोत्पादनाचे जनक कृषि महर्षी डॉ. जी.एस. चीमा यांची १२९ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. प्रदिप दळवे, वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. युवराज बालगुडे, वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. सुनील नाळे उपस्थित होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या स्थापनेनंतर सन १९६९ मध्ये कृषि महाविद्यालय, पुणे येथे पार पडलेल्या सोहळ्यात डॉ. चिमांचा तत्कालीन मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांनी विकसित केलेल्या डाळिंबाच्या वाणास गणेश, पेरूच्या लखनौ ४९ या वाणास सरदार तर द्राक्षाच्या सिले. ७ या वाणास चीमा साहेबी असे नामकरण करण्यात आले. डॉ. चिमांनी विकसित केलेले विविध फळपिकांचे वाण १०० वर्षे उलटूनही आजतागायत लोकप्रिय असून यामुळे राज्यातील तसेच देशभरातील हजारो शेतकऱ्यांच्या जीवनमानाचा कायापालट झाला आहे. डॉ. चिमा यांना कृषि महर्षी तसेच भारतीय फलोद्यानाचे जनक म्हणून यथार्थपणे ओळखले जाते. कार्यक्रमादरम्यान डॉ. प्रदीप दळवे यांनी डॉ. चिमा यांचा जीवनपट व फलोत्पादनातील संशोधनकार्यास उजाळा दिला आणि त्यांनी दिलेले योगदान आजही संशोधक, शेतकरी आणि विद्यार्थी यांना प्रेरणादायक असल्याची भावना व्यक्त केली. सदर कार्यक्रमास श्री. नितीश घोडके, सहाय्यक श्री. संदीप लिंभोरे उपस्थित होते.

## कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फ़ार्म येथे वनमहोत्सव साजरा




**दि. १२ जुलै, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेले कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फार्म, पुणे येथे उत्साहवर्धक वातावरणात वनमहोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य श्री. आर.एस. काळभोर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी. यादव, कनिष्ठ संशोधन सहाय्यक श्रीमती एस.जी. नवसुपे, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. काळभोर यांनी वनमहोत्सव साजरा करणे आवश्यक असल्याचे सांगून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षलागवड करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच सदर

वनमहोत्सव कार्यक्रम राबविल्याबद्दल विद्यालयाचे कौतुक करून उपक्रम चांगला असल्याचे मत व्यक्त केले. डॉ. एस.टी. यादव यांनी वनमहोत्सवाबाबत प्रास्तविक सादर करून वृक्ष लागवडीचे महत्व विषद केले. मानवी दैनंदिन जीवनात वृक्षलागवडीचे विशेषतः ऑक्सीजन आणि प्रदुषण या विषयी मार्गदर्शन केले. यावेळी आंबा, लिंबू, नारळ अशा रोपांची लागवड करण्यात आली.

## कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फ़ार्म येथे विद्यालयाच्या प्रवेशप्रक्रियेबाबत जनजागृती



**दि. २ जुलै २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेले कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फ़ार्म, पुणे येथे जगतगुरू संत तुकाराम महाराज पालखी यांच्या पायी दिंडी सोहळ्याचे भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले. कृषि तंत्र विद्यालयाची सन २०२४–२५ ची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने चालू आहे. या अनुषंगाने कृषि तंत्र विद्यालयाच्या प्रांगणात प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील बॅनर आणि पॅम्प्लेट तयार करून विद्यालयाचा स्टॉल उभारण्यात आला. याप्रसंगी दिंडीत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सहभागी झालेले सर्व भाविक, वारकरी, विविध संस्थास्तरावरील मान्यवर, प्रतिनिधी तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांनी कृषि तंत्र विद्यालयाच्या स्टॉलला मोठ्या प्रमाणात भेट देवून कृषि तंत्र विद्यालयाबद्दल तसेच महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीमध्ये चालणाऱ्या विविध प्रकारच्या संशोधनाबद्दल माहिती घेऊन उत्तमप्रकारे प्रतिसाद दिला. यातून चांगल्याप्रकारे जनजागृती होवून विद्यार्थी प्रवेशसंख्येत जास्तीत जास्त वाढ होण्यास मदत होईल. सदर उपक्रम कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ संशोधन सहाय्यक श्रीमती एस.जी. नवसुपे, कृषि सहाय्यक श्री. पी.डी वनवे, श्री. माधव बिलाडी, श्रीमती. प्रीती वैरागर, श्रीमती. मनिषा खैरे तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थी–विद्यार्थिनी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमात मोलाचा सहभाग घेवून राबविण्यात आला.

## ऑगस्ट महिन्यातील कामांचा तपशील

### ऊस

- आडसाली उसाच्या लागवडीची कामे ३० ऑगस्ट पर्यत पूर्ण करावीत.
- ऊस लागवडीसाठी दोन सरीमधील अंतर मध्यम जमिनीत १०० सें.मी. व भारी जमिनीत १२० सें.मी. ठेवावे. पट्टा पध्दतीसाठी मध्यम जमिनीत ९०–१५० सें.मी. व भारी जमिनीत ९०–१८० सें.मी. पट्टा पध्दतीचा अवलंब करावा.
- रोगग्रस्त किडग्रस्त शेतातील व खोडव्याचे बेणे लागणीस वापरू नये. ऊस बेणे मळयातीलच चांगले ऊस बेणे निवडून लागणीसाठी वापरावे.
- आडसाली लागण करताना को ८६०३२, फुले ०२६५, फुले ऊस १५०१२ आणि व्हीएसआय ०८००५ यापैकी कोणत्याही शिफारशीत वाणांचा जमिनीच्या मगदूरानुसार वापर करावा.
- ऊस बेणे लागण करण्यापूर्वी १० ग्रॅ कार्बेन्डॅझिम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १० मिनिटे बुडवावे आणि तेच बेणे परत १ किलो ॲसेटोबॅक्टर आणि १२५ ग्रॅम स्फुरद विरघळविणारे जिवाणू प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात ३० मिनिटे बुडवून ठेवावे व नंतर लागणीसाठी वापरावे, त्यामुळे नत्राच्या मात्रेत ५०% व स्फुरदाच्या मात्रेत २५% इतकी बचत होते.
- वाळवीकिडीच्यानियंत्रणासाठी क्लोथीआनिडीन५०% डब्ल्यू.डी. जी. हेक्टरी २.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पंपाची तोटी (नोझल) काढून सरीतून सोडावे व मुळ पोखरणारी अळीच्या बंदोबस्तासाठी फिप्रोनिल ०.३% दाणेदार प्रति हेक्टरी २५ किलो

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

सरीमध्ये चळीतून द्यावे.

- ऊस लागणीकरीता ऊसाच्या एक डोळा अथवा दोन डोळा टिपरीचा वापर करावा.
- उसावरील तपकिरी ठिपके आणि पोक्का बोईंग या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर ३० ग्रॅम मॅन्कोझेब १० लिटर किंवा कार्बेन्डझीम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून या बुरशीनाशकाच्या ३ फवारण्या १२ दिवसाच्या अंतराने कराव्यात. तांबेरा रोगाच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर ०.३ % मॅन्कोझेब ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा टेब्युकोनॅझोल ०.१% १० मिली + ॲझोऑक्सीस्ट्रॉबीन १८.२% + डायफेनकोन्याझोल ११.४% एस.सी. ०.१% १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- हुमणी किडीचा बंदोबस्त करण्यासाठी, हुणीग्रस्त ऊस पिकांची रोपे उपटावीत. जमिनीत मुळाशेजारी मिळालेल्या अळया गोळा करुन रॉकेल मिश्रीत पाण्यात टाकून माराव्यात. रासायनिक नियंत्रणासाठी फिप्रोनिल ४०% + इमिडाक्लोप्रीड ४०% दाणेदार हेक्री ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पंपाची तोटी (नोझल) काढून सरीतून सोडावे अथवा थायमिथोक्झाम ०.९०% + फिप्रोनिल ०.२०% जी.आर. हेक्टरी १५ किलो सरीमध्ये चळीतून द्यावे.
- आडसाली ऊसाची लागण केल्यानंतर जमिनीत वापसा आल्यानंतर (साधारण ३–४ दिवसांनी) ऊसातील तणांच्या बंदोबस्तासाठी ५० ग्रॅम ॲट्राझिन किंवा १५ ग्रॅ मेट्रीब्युझीन १० लिटर पाण्यात मिसळून संपुर्ण क्षेत्रावर फवारणी करावी.
- आडसाली ऊसाला लागवडीचे वेळी शिफारशीतील मात्रेच्या १० टक्के नत्र, ५० टक्के स्फुरद, ५० टक्के पालाशयुक्त खताची मात्रा घ्यावी. ऊसासाठी नत्रयुक्त खतासाठी निमकोटेड युरीयाचा वापर करावा.
- ऊसाला खते देताना को ८६०३२ या जातीसाठी हेक्टरी ५००:२००:२०० किलो नत्र, स्फुरद व पालाश ही खतमात्रा घ्यावी तर कोएम ०२६५ व कोव्हीएसआय ९८०५ या वाणांसाठी हेक्टरी ४००:१७०:१७० किलो नत्र, स्फुरद व पालाश खतमात्रेचा वापर करावा.
- माती परीक्षणाच्या आधारे जमिनीमध्ये सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास प्रति हेक्टरी प्रति हेक्टरी २५ किलो फेरस सल्फेट, २० किलो झिंक सल्फेट, १० किलो मॅगेनीज सल्फेट आणि ५ किलो बोरॅक्स ही सुक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खते चांगल्या कुजलेल्या शेणखतात १०:१ प्रमाणात मिसळून २ ते ३ दिवस मुरवून सरीमध्ये चळी घेवून मातीआड करावीत.

### बागायती कापूस

- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव समजण्यासाठी व नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे (२५ प्रति हेक्टर) शेतात लावावे.
- रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त दिसून आल्यास पायरीप्रोक्झीफेन १० ई.सी. २० मिली. किंवा बुप्रोफेझीन २५ मिली. किंवा फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू जी. २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त असल्यास पायरीप्रोक्झीफेन १० ई.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- कामगंध सापळ्यामध्ये सतत २–३ दिवस, ८–१० गुलाबी बोंड अळीचे पतंग दिसून आल्यास प्रोफेनोफॉस ५० ई. सी. प्रमाणे २० मिली किवा लम्वडा सायहॅलोथ्रीन ५ ई. सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- बुरशीजन्य करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पायरीक्लोस्ट्रोबीन २० डब्ल्यू. जी. १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा मेटीराम ५.५% + पायरॅब्लोरोस्टोवीन ५% डब्ल्यु.जी. २० ग्रॅम प्रति १० ली. पाण्यात फवारणी करावी.
- मॅग्नेशिअम सुक्ष्म अन्नद्रव्ये २० ते ३० कि.ग्रॅम प्रति हेक्टरी जमिनीत द्यावे. लाल्या रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास २ टक्के डायअमोनियम फॉस्फेट खताचे द्रावण १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळेस पिकावर फवारावे.
- गुलाबी बोंड अळीग्रस्त डोमकळ्या तोडून आतील अळीसह नष्ट कराव्यात.
- कपाशीच्या शेतात पक्षांना बसण्यासाठी हेक्टरी किमान २५ पक्षीथांबे उभे करावेत, म्हणजे पक्षी त्यावर बसून शेतातील अळ्या टिपून खातील.

### कडधान्य पिके

### मूग आणि उडिद

- फुलकळी लागण्याच्या आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत गरजेनुसार शिफारशीत किड व रोग नियंत्रणाचे उपाय करावेत. यासाठी

मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के एस एल ६२५ मि.ली. + पाण्यात मिसळणारे गंधक १२५० ग्रॅम ५०० लिटर पाणी / हेक्टरी मिसळून फवारणी करावी.

- पाऊस नसल्यास संरक्षित पाणी द्यावे. अथवा २ टक्के युरिया किंवा पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.

### तूर

- किड व रोग नियंत्रणासाठी एकात्मिक किड नियंत्रण पध्दतीचा अवलंब करावा.
- पाऊस नसल्यास पिकास संरक्षित पाणी द्यावे. किंवा फुलअवस्थेत २ टक्के युरियाची फवारणी करावी.

### भात पीक

- रासायनिक खतांचा वापर : हळव्या जातींमध्ये उरलेले ५० टक्के नत्र लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी द्यावे. निमगरव्या व गरव्या जातींमध्ये लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी ४० टक्के नत्र आणि २० टक्के नत्र लागणीनंतर ५५ ते ६० दिवसांनी द्यावे. संकरित जातींकरिता हेक्टरी उरलेले २५ टक्के नत्र  लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी आणि उर्वरीत २५ टक्के नत्र लागणीनंतर ५५ ते ६० दिवसांनी द्यावे.
- पाणी व्यवस्थापन : भात पिकाच्या योग्य वाढीकरीता व अधिक उत्पादनाकरीता भात खाचरात पाण्याची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी पुढीलप्रमाणे असावी. भात पोटरी अवस्थेत – ५ ते ३० सें.मी.

### नाचणी पीक

- पिकामध्ये नांग्या असल्यास १५ ते २० दिवसांनी नांग्या भरून घ्याव्यात.
- एक कोळपणी २० ते २५ दिवसांनी करावी.
- आंतरमशागत : एक कोळपणी व एक खुरपणी एक खुरपणी ४५ ते ६० दिवसांनी करावी.
- पेरणीनंतर ३० दिवसांनी ३० किलो नत्र द्यावे.

### बाजरी

- पिकाची दोन वेळा कोळपणी व गरजेनुसार १ ते २ वेळा खुरपणी करावी. पिकास ताण पडल्यास व पाणी उपलब्ध असल्यास पिकाच्या संवेदनक्षम अवस्थेत पाणी द्यावे.

### सोयाबीन

- तांबेरा रोगाच्या नियंत्रणासाठी प्रोपिकोनॅझोल २५% ईसी / हेक्झाकोनॅझोल ५% ईसी १० मिली प्रती १० ली पाण्यातून फवारावे.
- करपा व पानांवरील ठिपके या रोगांच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसू लागताच कॉपर ऑक्झीक्लोराईड ५० डब्लू पी २५ ग्रॅम किंवा टेब्युकोनॅझोल १०%+ सल्फर ६५ % डब्लू जी २० ग्रॅम प्रती १० ली पाण्यातून फवारावे.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवाडा मुलस्थानी जलसंधारण करण्यासाठी ट्रॅक्टरचलित औजाराच्या सहाय्याने २x६ मीटर सारे पाडणे/बैलाच्या सहाय्याने १०ु१० मी. अंतरावर बांध घालावेत. जास्त उतार असल्यास ५ x५ मी.वर सारे पाडावे.

### फळबाग व्यवस्थापन

- डाळिंब – फळातील रस शोषणारे पतंग, तेलकट डाग रोग व बुरशीजन्य या रोगांचे नियंत्रण करावे.
- सिताफळ– पिठ्या ढेकुण नियंत्रणासाठी जैविक व निंबोळीयुक्त किडनाशकाचा वापर करावा, बुरशीजन्य रोगाचे नियंत्रण करावे.किडग्रस्त व रोगट फळे काढुन नष्ट करावीत.
- बोर – पाने खाणाऱ्या /केसाळ अळी भुंगेरे यांचे नियंत्रण करावे. मधमाशी संवर्धन करावे.
- अंजीर – अंजीर पिकावरील खोडकिड व सुत्रकृमीचे नियंत्रण करावे. खोडांना गेरू पेस्ट लावावी.
- कागदी लिंबू – पावसाचे जादा पाणी चराद्वारे बागेच्या बाहेर काढून द्यावे. सिल्ला, मावा व पाने पोखरणारी अळी : डायमिथोएट २० मिली

अथवा इमिडाक्लोप्रीड २.५ मिली/१० लि. पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

- कँकर / खैऱ्या रोग : कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाणी. पेरूवरील फळमाशी नियंत्रणासाठी मिथाईल थुजेनॉलचे सापळे लावावीत.
- पेरु – देवी रोगाचे नियंत्रण करावे. त्यासाठी कार्बेनडेझिम ३%+ मॅनकोझेब ६३% डब्लुपी २ ग्रॅम प्रतिलिटर पाणी या प्रमाणात फवारावे.

**भाजीपाला व्यवस्थापन**

- खरीप कांदा पिकाचे लागवडीसाठी रानबांधणी करावी.
- कांद्याची ७ ते ८ आठवड्याची रोपे लागवडीस वापरावी.
- लागवडीचे वेळेस कांदा रोपांची मुळे किडनाशक, बुरशीनाशक व जिवाणू खतांच्या द्रावणात बुडवावे.
- लागवडीचे वेळी खत मात्रेपैकी निम्मे नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीचे वेळेस द्यावी.
- खरीप मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, गवार, वेलवर्गीय भाजीपाला पिकांना खुरपणी करून नत्र खताचा पहिला हप्ता द्यावा.
- कीड व रोग नियंत्रणाचे उपाय करावेत.
- सतत ढगाळ वातावरण असल्यास ७ ते ८ दिवसांच्या अंतराने बुरशीनाशकाची फवारणी करावी.
- पिकामध्ये पाणी साचू देऊ नये.
- रांगडा कांदा लागवडीसाठी बियाणाची पेरणी करावी.

**आले**

- वेळच्या वेळी येणारी तणे खुरपणी करून काढून टाकावीत.
- उटाळणी करणे : आले पीक २.५ ते ३ महिन्याचे असताना उटाळणी करावी. यामध्ये लांब दांड्याच्या खुरप्याने माती हलवली जाते. त्यामुळे मुळ्या तुटून त्याठिकाणी नवीन तंतुमय मुळे फूटतात. आले पिकास ६ व्या ते ७ व्या महिन्यात फुले येतात त्यास हुरडे बांड असे म्हणतात. उटाळणी हूरडे बांड येण्यापूर्वी करावी. हुरडे बांड फुटल्यावर या पिकाच्या पानांची वाढ थांबून फण्याची वाढ होण्यास सुरूवात होते.
- उटाळणीनंतर पाण्याचा हलका ताण द्यावा म्हणजे फुटवे चांगले फुटतात.
- जमीन चुनखडयुक्त असेल तर पाने पिवळी पडलेली व शेंडा करपलेला दिसतो यावेळी मुळांना स्फुरद उपलब्ध होत नाही व त्यासाठी स्फुरद उपलब्ध करणारे जिवाणू खत एकरी २ किलो पाण्याद्यारे द्यावे.
- रिमझीम पावसात शाकीय वाढ चांगला जोर धरु लागते. अशावेळेस पिकास जास्त खाद्य अन्न लागते. त्याच्या वाढीचे बारकाईने निरीक्षण करुन नत्राचा दुसरा हप्ता ६० किलो नत्र द्यावे.
- हेक्टरी १.५ ते २.० टन करंजी किंवा निंबोळी पेंड द्यावी.
- कंदकूज रोगापासून आले पिकाचे संरक्षण करावे. आले पिकांवरील कंदकूज हा एक प्रमुख रोग आहे. वेळीच खबरदारी न घेतल्यास या रोगामुळे ५० टक्के पर्यत नुकसान होऊ शकते. भरपूर पाऊस, भारी काळी कसदार, कमी निचरा असणारी जमीन या रोगास पोषक ठरते. हा रोग ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीमध्ये जास्त प्रमाणात दिसून येतो. प्रथम पानांच्या शेंडयावरून व कडांनी पिवळे पडून झाड खालीपर्यत वाळले जाते. खोडलगतचा जमिनीलगतचा भाग काळपट राखी पडतो. याच ठिकाणी माती बाजूस करून पाहिल्यास गड्डाही वरून काळा पडलेला व निस्तेज झालेला दसतो. या भागावर दाब दिल्यास त्यातून कुजलेले, घाण वास येणारे पाणी बाहेर येते. अशा झाडाचे खोड थोडे जरी ओढले तरी चटकन हातात येते. हा रोग प्रामुख्याने सुत्रकृमी किंवा खुरपणी करताना, आंतरमशागत करताना कंदास इजा झाल्यास त्यातून पिथीयम फुयजेरियम यासारख्या बुरशींचा गड्डयामध्ये शिरकाव होऊन कंद कुजण्यास सुरुवात होते.

**फवारणीसाठी ड्रोन**

- **तपशील** : टाकीची क्षमताः १० लि., वजन उचलण्याची क्षगताः २५ किलो, नोझलची संख्याः ४, नोझलचा प्रकारः फ्लॅट फॅन, कोन ॲगलः ११००, थेंबाचा आकारः १०० ते १५० मायक्रॉन, फ्रेम कॉन्फ्रिगरेशनः (हेक्झाकॉप्टर), सहा रोटर, उर्जास्त्रोतः लिथीयम पॉलीमर बॅटरी (२ x २२००० ।अह), ऑपरेशनः मनुष्यसंचलित आणि स्वयंचलित, सुरक्षितता प्रणालीः स्वयंचलित उड्डानाच्या ठिकाणी परत येणे

(बॅटरी संपणे, दूर संवेदकाशी संपर्क तुटणे, जास्त वारे इ.), उड्डाण क्षमता (फवारणी करतांना): १२ ते १५ मिनीटे, थेट प्रसारणासाठी कॅमेरा, कमाल उंचीः ३० मी. (मर्यादीत)

- **फायदे :** फवारणीचा वेळ, पैसा आणि मानवी शक्तीची बचत होते, प्रभावी आणि कार्यक्षम फवारणी होते, माणसांचा थेट संपर्क होत नसल्याने मानवी आरोग्यावर रसायनांचा दुष्परिणाम होत नाही, कोणत्याही प्रकारच्या पिकासाठी वापर करता येतो, जास्त उंची असलेल्या पिकांसाठी अधिक उपयुक्त उदा. ऊस, तुर, केळी, डाळिंब इ.

**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७५०/२०२४**